MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १८ अंक : ६ पाने : ८ ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२३ www.mahatransco.in Follow us on :

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

आजच्या आधुनिक युगात तंत्रज्ञान व आधुनिकीकरणावर भर देणे गरजेचे आहे. महापारेषणसारख्या पायाभूत सुविधा पुरविणाऱ्या कंपनीस आधुनिकीकरणावर काम करण्यास खूप संधी आहे. सर्वतोपरी विचार केला असता असे दिसते की, महापारेषणच्या पायाभूत सुविधांमध्ये (उपकेंद्र, तारमार्ग) फार मोठा टप्पा गाठण्यास कंपनीस यश आले आहे. यापुढे त्यामध्ये आधुनिकीकरण आणण्याचे आव्हान कंपनीसमोर आहे.

कंपनी फार मोठ्या प्रमाणावर

- **आधुनिकीकरणावर भर द्यावा**
- **कामांचा आढावा घ्या**
- **वेळेत प्रकल्प पूर्ण करा**
- **सांघिक भावना कायम ठेवा**

ईआरपीच्या तसेच सबस्टेशन ऑटोमेशन (स्काडा अंमलबजावणी) च्या माध्यमातून आधुनिकीकरणावर प्रयत्न करत आहे. जीआयएस सब स्टेशनची निर्मिती, Assets Management, Remote Controlling, Drone Based Patrolling असे अनेक अभिनव उपक्रम कंपनी प्राधान्यक्रमावर राबवित आहे. त्याचबरोबर जुनी झालेली महापारेषण यंत्रणा त्यास अद्ययावत करण्याचे सुध्दा प्रयत्न युध्दपातळीवर सुरु आहेत. मला आशा आहे की, पुढील काही वर्षात आधुनिकीकरणाचा फार चांगला टप्पा पार पाडण्यास आपण यशस्वी होऊ.

महापारेषण कंपनीच्या कामगिरीचा आलेख दरवर्षी चढता असलेला आपण पाहतो. मात्र, कंपनीत होणाऱ्या दुर्घटना व त्यामधील जीवितहानी याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. अशा घटना कोणत्याही परिस्थितीत आपल्याला टाळणे गरजेच्या आहेत. किंबहुना, दुर्घटनाविरहित यंत्रणा सुसज्ज व देखभाल व्यवस्थित ठेवणे यासाठी आपण सर्वांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. आजमितीस फार चांगली सुरक्षा यंत्रणा आपण महापारेषणमध्ये राबवित आहोत. परंतु, तरीही दुर्घटना का घडतात? याबाबत सखोल अभ्यास करून त्यातील त्रुटींवर आपल्या सर्वांना उपाययोजना करणे आवश्यक आहेत. किंबहुना, प्रत्येक विभाग, मंडळ व परिमंडल यांनी सुरक्षा दृष्टिकोनातून सततचा आढावा घेऊन आपली प्रणाली दुर्घटना प्रतिबंधीत करण्याचे ध्येय ठेवणे गरजेचे आहे.

आज प्रशासन कालबध्द पध्दतीत परिमंडळाची आढावा बैठक घेत आहे. त्या बैठकीतून यंत्रणेला चालना देण्यासाठी मदत होत आहे. प्रत्येक आढावा बैठकीतून आपल्याला कंपनीने दिलेल्या जबाबदारीचे सादरीकरण प्रशासनासमोर करावयाची एक चांगली संधी त्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयांना प्राप्त झालेली आहे. या आढावा बैठकीतून आपण कुठे मागे आहोत? तसेच कोणत्या बाबींवर आपण चांगली कामगिरी करत आहोत. तसेच क्षेत्रीय कार्यालयांना कोणत्या प्रकारची प्रशासनातर्फे मदत किंवा साधनसामुग्रीची गरज आहे, हे लक्षात घेऊन त्यावर उपाययोजना करता येते. माझी अपेक्षा आहे की, अशा प्रकारची पुनरावलोकन व परीक्षण आढावा बैठक प्रत्येक वरिष्ठ कार्यालयाने त्यांच्या अंतर्गत असलेल्या कनिष्ठ कार्यालयांशी घेतल्यास फार चांगल्या प्रकारचा सकारात्मक बदल कंपनीची एकंदरीत कार्यक्षमता वाढविण्यासाठी मोलाची ठरेल.

कंपनीने नियोजित केलेले प्रकल्प वेळेत व नियोजित खर्चात पूर्ण करणे सर्व प्रकल्प अभियंत्यांची जबाबदारी आहे. प्रकल्प कार्यान्वित करण्यात आपल्यासारख्या पायाभूत सुविधा देणाऱ्या कंपनीस अनेक अडचणी येणार, हे साहजिकच आहे. मात्र, त्या अडचणींवर मात करण्याचेच कौशल्य आपल्या अभियंत्यांकडे असणे गरजेचे आहे. याबाबत



**डॉ. संजीव कुमार** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी योग्य ते मार्गदर्शन करून आपला अनुभव आपल्या चमूस देणे गरजेचे आहे. प्रकल्पांमध्ये आऊट ऑफ बॉक्स विचार तसेच सृजनशीलतेचा (Creativity) वापर करून प्रकल्पातील अडचणींवर मात करावी लागते. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयांचे विषय, अडचणी, आव्हाने वेगवेगळी असतात. त्यांना मात करण्यासाठी उपाययोजना सुध्दा स्थानिक पातळीवर शोधावी लागते. प्रकल्पांमध्ये त्यामुळे आपल्याला प्रत्येक समस्या वेगवेगळ्या माध्यमातून बघणे गरजेचे असते.

संचलन व सुव्यवस्थेमध्ये नियोजनाचे अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. कंपनीने ठरवून दिलेल्या नियोजनात्मक कामाच्या अंमलबजावणीमुळे संचलन व सुव्यवस्था उत्तम पध्दतीने राखण्यास मदत होते. कोणत्याही पध्दतीचा व्यत्यय व अनियमितता आपल्याला अनेक अडचणींना आमंत्रण देऊ शकते. त्यासाठी प्रत्येक वरिष्ठ अधिकाऱ्याने नियमबध्द आढावा घेऊन नियोजनात्मक कामे पार पाडतील, याची दक्षता घेणे गरजेचे आहे.

**शुभेच्छांसह..!**

**- डॉ. संजीव कुमार**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



**नाशिक :** येथील परिमंडलीय प्रशासकीय इमारतीचे प्रकाशकुंभ असे नामकरण महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य अभियंता श्री. सुनील शेरेकर, श्री. सुनील सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता श्री. किशोर गरुड, नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे.

## ▶ परिमंडलीय प्रशासकीय इमारतीचे प्रकाशकुंभ नामकरण

# नाशिक परिमंडलांतर्गत विविध प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर : डॉ. संजीव कुमार

Follow us on :

महापारेषण कंपनीच्या माध्यमातून नाशिक परिमंडळांतर्गत विविध प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर असून सदर कामांचा आढावा घेण्यासाठी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी नाशिक परिमंडळास भेट दिली. या वेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या हस्ते नाशिक परिमंडळीय प्रशासकीय इमारतीचे प्रकाशकुंभ असे नामकरण करण्यात आले.

सुरूवातीला महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या अध्यक्षतेखाली कामांची आढावा बैठक घेण्यात आली. या वेळी संचालक (संचलन) श्री. संदीप कलंत्री, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य अभियंता श्री. सुनील शेरेकर, श्री. सुनील सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता श्री. किशोर गरुड, नाशिक परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे उपस्थित होते.

मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे यांनी पॉवरपाईंट सादरीकरणाने नाशिक परिमंडळांतर्गत एकूण सुरू असलेल्या (Life Extension Schemes) तसेच उपकेंद्र व अउदा वाहिनी योजनांची स्थिती, सध्या सुरू असलेल्या रोहित्र क्षमता वाढ योजनांची स्थिती, पारेषण प्रणालीचे निर्बंध आणि त्यावरील उपाय, समान आरओडब्ल्यू वापरून ट्रान्समिशन क्षमता वाढविणे व नवीन व नवीकरणीय ऊर्जा गुंतवणुकीच्या अपेक्षेने प्रणाली मजबूत करणे. नाशिक परिमंडळांतर्गत सुरू असलेले नवीन उपकेंद्र व नवीन पारेषण वाहिनी, लिंक लाईन्सचे प्रकल्प याविषयी माहिती आढावा बैठकीत सादर केली. दुर्गम भागातील अति उच्च दाब वाहिन्यांचे वेळेवर सर्व्हेक्षण व देखरेख करण्यासाठी नाशिक परिमंडळाने ड्रोनचा चांगला वापर केला असल्याचा विशेष उल्लेख या सादरीकरणादरम्यान करण्यात आला. या आढावा बैठकीदरम्यान अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी ४००/२२० के. व्ही. पिंपळगाव व मालेगाव यांचे काम प्राधान्याने लवकरात लवकर करण्यात यावे, ज्या जागा ताब्यात आहेत त्यांच्या सर्व बाबी तपासून कामे सुरु करावीत. तसेच जेथे आरओडब्ल्यू येत आहे, अशा सर्व प्रकल्पांची माहिती तसेच इतर काही शासकीय मुद्दे असतील तर त्याबाबत सांघिक कार्यालयास कळविण्यात यावेत, अशा सूचना दिल्या. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांसमवेत चर्चा करून याबाबत तोडगा काढला जाईल, अशी ग्वाही दिली.आढावा बैठकीच्या शेवटी मुख्य अभियंता श्री. संजीव भोळे यांनी सर्वांचे आभार मानले.

---

### ऑल इंडिया इलेक्ट्रिसिटी स्पोर्टस कंट्रोल बोर्डच्या व्हाईस प्रेसिडेंटपदी

## श्री. भरत पाटील यांची निवड



ऑल इंडिया इलेक्ट्रिसिटी स्पोर्टस कंट्रोल बोर्डच्या व्हाईस प्रेसिडेंटपदी महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील यांची निवड झाली आहे. AIESCB च्या वतीने दरवर्षी १६ प्रकारच्या आंतरगृह (Indoor) तसेच बाह्यगृह (Outdoor) क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातात. यामध्ये देशातील एकूण २९ राज्यांमधील ऊर्जा विभाग आपला सहभाग नोंदवितो. श्री. भरत पाटील यांच्या निवडीने महापारेषण कंपनीस प्रथमच AIESCB मध्ये प्रतिनिधीत्व मिळाले असल्याने कंपनीच्या खेळाडू कर्मचारी यांच्यामध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

## श्री. सुनील सूर्यवंशी

## संचालक (प्रकल्प) (प्रभारी)



श्री. सुनील सूर्यवंशी यांच्याकडे दि. १०.१०.२०२३ पासून संचालक (प्रकल्प) या पदाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे. श्री. सूर्यवंशी यांनी पुणे विद्यापीठातून विद्युत अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले आहे. ते पूर्वाश्रमीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात १९९४ मध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर रुजू झाले. तद्नंतर ते २००६ साली थेट भरतीमध्ये कार्यकारी अभियंता या पदावर रूजू झाले. विभागांतर्गत बढतीव्दारे २०१३ मध्ये अधीक्षक अभियंता आणि २०२२ मध्ये मुख्य अभियंता या पदावर रुजू झाले. त्यांना प्रकल्प, चाचणी, संचलन व व्यवस्था, ईआरपी, आर ॲन्ड सी कक्ष, सीएमडी कार्यालय इत्यादी कामाचा सुमारे तीस वर्षांचा अनुभव आहे.


@maha_transco MahaTransco @Mahatranscoltd www.mahatransco.in

**Review Meeting** महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी घेतली पुण्यात आढावा बैठक

# कामे तातडीने करण्याचे डॉ. संजीव कुमार यांनी दिले निर्देश



**पुणे :** येथील परिमंडलातील कामांबाबत आढावा बैठक घेताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार. याप्रसंगी संचालक (प्रकल्प) श्री. सुनील सूर्यवंशी, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य अभियंता श्री. सुनील शेरेकर, अधीक्षक अभियंता श्री. किशोर गरूड, पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप, अधीक्षक अभियंता श्री. प्रमोद भोसले, श्री. राम शेळके, श्री. प्रकाश कुरसंगे, श्री. जयंत कुलकर्णी, श्री. संदीप हाके.

Follow us on :

महापारेषण कंपनीच्या माध्यमातून पुणे परिमंडलांर्गत विविध प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर असून सदर कामांची आढावा बैठक घेण्यासाठी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी पुणे परिमंडलाला भेट दिली.

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या अध्यक्षतेखाली कामांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला संचालक (प्रकल्प) श्री. सुनील सूर्यवंशी, कार्यकारी` संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य अभियंता श्री. सुनील शेरेकर, अधीक्षक अभियंता श्री. किशोर गरूड, पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप, अधीक्षक अभियंता श्री. प्रमोद भोसले, श्री. राम शेळके, श्री. प्रकाश कुरसंगे, श्री. जयंत कुलकर्णी, श्री. संदीप हाके उपस्थित होते.

मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप यांनी पुणे परिमंडलांर्गत एकूण सुरू असलेल्या कामकाजाबाबत पॉवरपॉईंट सादरीकरणाने माहिती दिली. पुणे शहर व जिल्ह्याची



वाढची विजेची गरज लक्षात घेऊन त्वरित करावयाची कामे व दीर्घकालीन कामे अशी वेगवेगळ्या पर्यायावर चर्चा करण्यात आली. यावर पुणे जिल्ह्यातील पारेषण प्रणाली सुरळीत व अद्ययावत ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक कामांची सूची तयार करून ती प्राधान्यक्रमाने अंमलात आणण्याचे निर्देश अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी दिले.

सध्या सुरू असलेले उपकेंद्र व अउदा वाहिन्यांची स्थिती, सध्या सुरू असलेल्या रोहित्र क्षमता वाढ योजनांची स्थिती, पारेषण प्रणालीचे निर्बंध आणि त्यावरील उपाय, नवीन व नवीकरणीय ऊर्जा गुंतवणुकीच्या अपेक्षेने प्रणाली मजबूत करणे, नवीन उपकेंद्र व नवीन पारेषण वाहिनी, लिंक लाईन्सचे प्रकल्प याविषयी आढावा बैठकीत चर्चा झाली.

महापारेषण व महावितरण कंपनी यांच्यामधील दोन्ही परिमंडलामध्ये समन्वय राहण्यासाठी महावितरणचे प्रादेशिक संचालक श्री. अंकुश नाळे, मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार तसेच सर्व अधीक्षक अभियंते उपस्थित होते. या बैठकीदरम्यान पुणे शहराची सद्यस्थिती, विजेची मागणी तीन हजार मेगावॅट असून त्यामध्ये दरवर्षी १० ते १५ टक्के विजेच्या मागणीमध्ये वाढ होत आहे. पुणे शहर व आसपासच्या उपनगरामध्ये वाढते शहरीकरण व औद्योगिकीकरणामुळे पुढील पाच वर्षामध्ये अंदाजे पाच हजार मेगावॅट विजेची मागणी होण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने पुणे व आसपासच्या उपनगरामध्ये नवीन उपकेंद्र स्थापन करण्यासाठी पारेषण कंपनीने सहकार्य करावे, अशी विनंती केली.

या आढावा बैठकीत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी २२० के. व्ही. खेड सिटी, ४०० के. व्ही. तळेगाव-चाकण वाहिन्यांचे काम प्राधान्याने लवकरात लवकर करण्यात यावे, ज्या जागा ताब्यात आहेत, त्यांच्या सर्व बाबी तपासून कामे सुरू करावीत, अशा सूचना देण्यात आल्या. आढावा बैठकीच्या शेवटी मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप यांनी सर्वांचे आभार मानले.




**नवी दिल्ली :** येथे पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने महापारेषणच्या जनसंपर्क विभागाला ऑस्ट्रियाच्या दूतावासाचे व्यापार उपायुक्त श्री. बर्नर्ड अँडरसन यांच्या हस्ते तीन पारितोषिके देण्यात आली. पारितोषिके स्वीकारताना महापारेषणचे संचालक (मनुष्यबळ विकास) श्री. सुगत गमरे व जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे. शेजारी जागतिक बँकेचे वरिष्ठ ऊर्जा सल्लागार श्री. राजीव रंजन मिश्रा, इंडिया टुडेचे संचालक श्री. ध्रुबा ज्योती पती, `पीआरएसआय'चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अजित पाठक, सचिव डॉ. पीएलके मूर्ती व अन्य पदाधिकारी.

▶ सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया अँन्ड पीआर, ब्रँडिंग व सर्वोत्कृष्ट फिल्मचा (इंग्रजी) पुरस्कार

▶ भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान विशेष पुरस्कार

# पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाची महापारेषणला तीन राष्ट्रीय पारितोषिके प्रदान

Follow us on :

पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिकांचे वितरण ऑस्ट्रियाच्या दूतावासाचे व्यापार उपायुक्त श्री. बर्नर्ड अँडरसन यांच्या हस्ते झाले. यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया ऍन्ड पीआर, ब्रँडिंग, सर्वोत्कृष्ट फिल्म (इंग्रजी) व भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान हा विशेष पुरस्कार मिळाला. महापारेषणचे संचालक (मनुष्यबळ विकास) श्री. सुगत गमरे व जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पारितोषिकांबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी जनसंपर्क विभागाचे अभिनंदन केले.

नवी दिल्लीतील डॉ. भीमराव आंबेडकर इंटरनॅशनल कन्व्हेंशन सेंटरमध्ये आयोजिलेल्या आंतरराष्ट्रीय जनसंपर्क महोत्सवाच्या समारंभात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी जागतिक बँकेचे वरिष्ठ ऊर्जा सल्लागार श्री. राजीव रंजन मिश्रा, इंडिया टुडेचे संचालक श्री. ध्रुबा ज्योती पती, `पीआरएसआय'चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अजित पाठक, सचिव डॉ. पीएलके मूर्ती यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

### जनसंपर्क विभाग अग्रेसर

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी यशाचे संपूर्ण श्रेय जनसंपर्क विभाग व त्यांच्या टीमवर्कला दिले आहे. सृजनशील व नावीन्यपूर्ण काम व मीडियात सातत्याने होणारे नवे बदल समजून जनसंपर्क विभागाने कामांमध्ये वैविध्यता आणून सकारात्मक बदल केले. विशेषतः सोशल मीडियाव्दारे (फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यू-ट्यूब, टेलिग्राम, थ्रेडस) जनसंपर्क विभागाने महापारेषणची भूमिका लोकांसमोर ठळकपणे मांडली. भविष्यातही, महापारेषणचा जनसंपर्क विभाग सातत्यपूर्ण कामगिरी करून महापारेषणचे नाव उंचावेल, असा विश्वास व्यक्त केला.

रमेश बैस

राज्यपाल, महाराष्ट्र

राज भवन
मलबार हिल
मुंबई ४०० ०३५

२७ डिसेंबर २०२३

# शुभेच्छा

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने देण्यात येणारी तीन पारितोषिके प्राप्त झाली असल्याचे समजून आनंद वाटला. संवाद क्रांतीच्या युगात प्रत्येक सार्वजनिक उपक्रम व संस्थेने जनसामान्यांच्या आशा व आकांक्षा जाणून घेतल्या पाहिजे तसेच त्यांच्या समस्यांचे यथाशीघ्र निराकरण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

जनसंपर्क, ही निरंतर प्रक्रिया असून त्यामध्ये प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याचे योगदान महत्वाचे असते. महापारेषणचे जनसंपर्क कार्य यापुढे देखील निष्ठेने सुरु राहील या विश्वासासह जनसंपर्क क्षेत्रातील पुरस्काराबद्दल सर्व संबंधितांचे हार्दिक अभिनंदन करतो व संस्थेला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देतो.

(रमेश बैस)

डॉ. संजय कुमार, भा.प्र.से.
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
महापारेषण

---

एकनाथ संभाजी शिंदे
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२
28 DEC 2023

डॉ. संजीव कुमार जी,

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील तीन पारितोषिके मिळाली, त्याबद्दल सर्वप्रथम आपले आणि आपल्या टीमचे मनापासून खूप-खूप अभिनंदन!

राष्ट्रीय स्तरावर महापारेषणने सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया ऍन्ड पीआर, ब्रँडिंग, सर्वोत्कृष्ट फिल्म (इंग्रजी) व भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान विशेष पुरस्कार पटकावले आहेत, ही कौतुकाची बाब आहे.

महापारेषणने आपल्या कार्यशैलीत अनेक सकारात्मक बदल करून हे यश प्राप्त केले आहे. यामुळे ऊर्जा क्षेत्राच्या विकासासाठी शासन उचलत असलेली पाऊले जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहचत आहेत. याचीच पावती या पुरस्कारांच्या रुपाने मिळाली आहे.

महापारेषणच्या वतीने नवी दिल्लीत हा पुरस्कार स्वीकारणारे महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे व जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांचेही अभिनंदन.

पुढील काळातही महापारेषण कंपनीला ऊर्जा क्षेत्रात उत्कृष्ट काम करण्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा !

(एकनाथ संभाजी शिंदे)

प्रति,
डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,
महापारेषण.

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, फॅक्स : ०२२-२२०२ ९२१४
ई-मेल : cm@maharashtra.gov.in, वेब साईट : www.maharashtra.gov.in

---

देवेंद्र फडणवीस
उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

दि. १३/१२/२०२३

## हार्दिक अभिनंदन

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने देण्यात येणारी राष्ट्रीय स्तरावरील तीन पारितोषिके मिळाली, ही आनंदाची बाब असून त्यासाठी 'टीम महापारेषण'चे हार्दिक अभिनंदन!

महापारेषण समाचार या गृहमासिकात अनेक डिजिटल बदल, क्यू-आर कोड, पॉडकास्टचा प्रभावी वापर, व्हॉटसअप बुलेटिन, ऑडिओ-व्हिज्युअल्स बुलेटिन, व्हॉटसअप चॅनेल आदी नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे महापारेषणने जनसंपर्काबाबात एक पाऊल पुढे टाकले असल्याचे दिसते. सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया ॲण्ड पीआर, ब्रँडिंग, सर्वोत्कृष्ट फिल्म (इंग्रजी) व भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान या विशेष पुरस्कारांसाठी पुनश्च महापारेषणचे मन:पूर्वक अभिनंदन. यापुढेही उत्कृष्टतेचा ध्यास घेत महापारेषणचे अधिकारी-कर्मचारी सेवेचा नवा आदर्श घडवतील, अशी आशा आहे.

शुभेच्छांसह..!

(देवेंद्र फडणवीस)

प्रति,
डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,
महापारेषण.

कार्यालय : ६ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दूरध्वनी : ०२२-२२०२ ५०१४ / २२०२ २४०१
ई-मेल : dcm@maharashtra.gov.in, संकेत स्थळ : www.maharashtra.gov.in

---

# महापारेषण के जनसंपर्क विभाग को राज्यपाल ने दी शुभेच्छा

**मुंबई(प्रतिनिधि),** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी (महापारेषण) के जनसंपर्क विभाग को उत्कृष्ट कार्य के लिए पब्लिक रिलेशंस सोसायटी ऑफ इंडिया (पीआरएसआई) की तरफ से तीन पुरस्कार मिले हैं। इस पुरस्कार मिलने पर महाराष्ट्र के राज्यपाल रमेश बैस ने महापारेषण के जनसंपर्क विभाग को हार्दिक शुभेच्छा दी है। महापारेषण के अध्यक्ष और प्रबंध निदेशक डा. संजय कुमार को पत्र लिखकर उक्त शुभेच्छा दी है। अपने पत्र में राज्यपाल ने कहा है कि सूचना क्रांति के युग में सार्वजनिक क्षेत्र के उपक्रमों को जनता की आकांक्षाओं पर खरा उतरने का प्रयास करना चाहिए। जनसंपर्क नित जारी रहने वाली प्रक्रिया है और इसमें अधिकारी -कर्मचारी की महत्वपूर्ण भूमिका होती है। जनसंपर्क के लिए मिलने वाले पुरस्कार के लिए विभाग के सभी लोगों को शुभेच्छा दी है और आशा व्यक्त की है कि संस्था इसी तरह आगे अपना जनसंपर्क जारी रखेगी।



Cyber Security Awareness ▶ अधिकारी व कर्मचाऱ्यांना सायबर सुरक्षेची प्रतिज्ञा

# महापारेषणमध्ये सायबर सुरक्षा जागृती अभियान



**मुंबई :** महापारेषणच्या मुख्य सांघिक कार्यालयात राष्ट्रीय सायबर सुरक्षा महिन्याअंतर्गत सायबर सुरक्षा जागृती अभियान राबविण्यात आले. याप्रसंगी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, संचालक (प्रकल्प) श्री. सुनील सूर्यवंशी, मुख्य अभियंता श्री. पीयूष शर्मा, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, अधीक्षक अभियंता श्री. किशोर गरूड व अन्य अधिकारी.

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) मुख्य सांघिक कार्यालय, मुंबई येथे राष्ट्रीय सायबर सुरक्षा महिन्याअंतर्गत सायबर सुरक्षा जागृती अभियान राबविण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे यांनी केले. प्रारंभी महापारेषण कंपनीच्या सहाय्यक प्रोग्रॅमर अमृता जगदाळे-मिस्त्री यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सायबर सुरक्षेसाठी प्रतिज्ञा दिली.

याप्रसंगी संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मनुष्यबळ विकास) श्री. सुगत गमरे, संचालक (प्रकल्प) (प्रभारी) श्री. सुनील सूर्यवंशी, कार्यकारी



संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य अभियंता श्री. पीयूष शर्मा, श्री. सुनील शेरेकर, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक(वित्त व लेखा) श्री. संतोष आंबेरकर, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, अधीक्षक अभियंता श्री. किशोर गरूड, श्री. अजय पटेल, उपमहाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्रीमती वर्षा असोलकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (ERP) श्रीमती लीना कसरेकर, प्रणाली विश्लेषक श्री. अतुल वारजुरकर, श्री. अनिल सोनवणे, श्री. बाबासाहेब कांबळे यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी दूरदृश्य प्रणालीव्दारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार श्रीमती मंजूषा चौधरी यांनी मानले.

**पडघे येथे सायबर सुरक्षा जागृती अभियान**

राष्ट्रीय सायबर सुरक्षा महिन्याअंतर्गत सायबर सुरक्षा जागृती अभियानानिमित्त महापारेषण कंपनीचे प्रणाली विश्लेषक (माहिती तंत्रज्ञान) श्री. अतुल वारजुरकर यांनी प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, पडघे येथे एक दिवसाचे "सायबर सुरक्षा व जागरूकता" प्रशिक्षण वर्ग घेतला. याप्रसंगी +/- ५०० के.व्ही. उदादिधा पडघे मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. राम कोल्हे, कार्यकारी अभियंता श्री. दीपक पाटील, श्री. सैय्यद अहमद तसेच श्री. शरद माळी यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते. तसेच या प्रशिक्षणादरम्यान सर्व उपस्थित अधिकारी वर्गाने सायबर सुरक्षेसाठी प्रतिज्ञा घेतली.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती-निवृत्ती माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर-२०२३

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. विठ्ठल भुजबळ | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा संवसु मंडळ, पुणे | ०३. ११. २०२३ |

आमच्याशी कनेक्टेड रहा
@maha_transco
@maha_transco
MahaTransco
MahaTransco
Mahatranscoltd
MahaTransco

Constitution of India

## संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन

# महापारेषणमध्ये संविधान दिवस साजरा

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला.

सुरूवातीला महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर यांच्या उपस्थितीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. यावेळी मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. मंगेश शिंदे, मुख्य विधी सल्लागार डॉ. किर्ती कुळकर्णी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. नितीन कांबळे, श्री. अभय रोही, अधीक्षक अभियंता श्री. रंगनाथ चव्हाण, श्री. सचिन खडगी, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. प्रशांत गोरडे यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**मुंबई :** महापारेषणच्या सांघिक कार्यालयामध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी डावीकडून महाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, मुख्य विधी सल्लागार डॉ. किर्ती कुळकर्णी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. मंगेश शिंदे, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. प्रशांत गोरडे, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. अभय रोही.

Vigilance Awareness Week



**मुंबई :** महापारेषणमध्ये दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. याप्रसंगी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना भ्रष्टाचार निर्मूलनाची प्रतिज्ञा देताना महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे व समोर अधिकारी व कर्मचारी वर्ग.

## कर्मचाऱ्यांनी घेतली भ्रष्टाचार निर्मूलनाची प्रतिज्ञा

# महापारेषणमध्ये दक्षता जनजागृती सप्ताह साजरा

Follow us on :

महापारेषणमध्ये दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला. महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना भ्रष्टाचार निर्मूलनाची प्रतिज्ञा दिली. प्रतिज्ञेनंतर मा. राज्यपाल व मा. मुख्यमंत्री यांनी या सप्ताहानिमित्त दिलेला संदेश उपस्थितांना वाचून दाखविण्यात आला. सप्ताहाच्या निमित्ताने जनजागृतीपर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) श्री. कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. संतोष आंबेरकर, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता श्री. पीयूष शर्मा, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. प्रशांत गोरडे, महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, उपमहाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. अभय रोही, अधीक्षक अभियंता (प्रशिक्षण) श्री. संजीवकुमार बड्डेला, अधीक्षक अभियंता श्री. अमित नाईक, कार्यकारी अभियंता (दक्षता) श्रीमती सुचेता सिंग, श्री. महेश आंबेकर यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.




**विजयनगर :** माण तालुक्यातील विजयनगर या प्रयोगशील शाळेला महापारेषण कंपनीकडून सांघिक सामाजिक जबाबदारी (CSR) निधीतून स्मार्ट डिजिटल बोर्ड व व्हिडिओ कॉन्फरन्स सेट भेट देण्यात आला. याप्रसंगी एबीपी माझा वृत्तवाहिनीचे मुख्य संपादक श्री. राजीव खांडेकर, कराड परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सी. एल. कोळी, श्री. संतोष बिदे, श्री. राजू कोळी, श्री. रमेश गमरे, श्री. सुभाष नरळे, श्री. सतीश जाधव, श्री. वसंत काळेल.

**सामाजिक उपक्रम**

## सीएसआर निधीतून व्हिडिओ कॉन्फरन्स सेट भेट

# महापारेषणतर्फे विजयनगर शाळेला स्मार्ट डिजिटल बोर्ड भेट

Follow us on :

माण तालुक्यातील विजयनगर या प्रयोगशील शाळेला महापारेषण कंपनीकडून सांघिक सामाजिक जबाबदारी (CSR) निधीतून स्मार्ट डिजिटल बोर्ड व व्हिडिओ कॉन्फरन्स सेट भेट देण्यात आला.

सुरूवातीला कार्यक्रमाचे उद्घाटन एबीपी माझा या वृत्तवाहिनीचे मुख्य संपादक श्री. राजीव खांडेकर यांच्या हस्ते झाले. या वेळी कराड परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सी. एल. कोळी, कार्यकारी अभियंता श्री. संतोष बिदे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. राजू कोळी, गटशिक्षणाधिकारी श्री. रमेश गमरे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. सुभाष नरळे, उपव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सतीश जाधव, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. वसंत काळेल उपस्थित होते.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विजयनगर, पर्यंती ता. माण जि. सातारा ही ग्रामीण व दुर्गम भागात असणारी प्रयोगशील शाळा तेथील गुगल टीचर श्री. बालाजी जाधव व शेशाबा नरळे या उपक्रमशील शिक्षकांनी तंत्रज्ञान, कौशल्य विकास, किचन गार्डन, स्टोरी टेलिंग, परसबाग, जगातील ४० देशांसोबत जोडली गेल्याने अवघ्या ९ विद्यार्थी पटसंख्येवरून आज ५० विद्यार्थी या शाळेत जागतिक शिक्षण घेत आहेत.

या शाळेचे अभिनव प्रयोग पाहून महापारेषण कंपनीव्दारे सीएसआर निधीतून शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. महापारेषणने सामाजिक बांधिलकी म्हणून ग्रामीण भागातील गोरगरीब मुलांना शिकण्याचा व समृध्द होण्याची एक संधी उपलब्ध करून दिल्याचे एबीपी माझा या वृत्तवाहिनीचे मुख्य संपादक श्री. राजीव खांडेकर यांनी सांगितले.

महापारेषणचे मुख्य अभियंता श्री. सी. एल. कोळी यांनी श्री. बालाजी जाधव यांच्या सहाय्याने राज्यभरात महापारेषणव्दारे दिलेल्या स्मार्ट डिजिटल बोर्ड (TV) व व्हिडिओ कॉन्फरन्स सेट इतर सर्व शाळांनाही भेट देणार असल्याचे सांगितले.

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **Dr.Milind Awatade** PRO for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,** Printed at **Jyotirling Enterprises :** 315-B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N.M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 23002574 & Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai - 400 051. The Company accepts no responsibility for the matter published in the journal.